## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २२ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विशारद स्किल डेव्हलपमेंट सेंटर आणि इन्फोसिस स्प्रिंगबोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी कम्युनिकेटिव्ह इंग्लिशचे सहा आणि कॉम्प्युटर लिटरसीचे पाच असे एकूण ११ मोफत ऑनलाइन कोर्सेस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढविणे, मुलाखतीसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे आणि सॉफ्ट स्किल्स अधिक सक्षम करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या कोर्सेसच्या माहितीपत्रकाचे विमोचन बुधवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या बैठकीत कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ विनोद पाटील, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. अमोल पाटील, नितीन झाल्टे, प्रा. पवित्रा पाटील, प्रा. सुरेखा पालवे, अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. उज्ज्वल पाटील, प्रा. रघुवंशी, इन्फोसिसच्या टीम लीडर ललिता भंगारे आणि विशारद स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या समन्वयिका प्रा. मधुलिका सोनवणे उपस्थित होत्या.

यावेळी कुलगुरू प्रा. माहेश्वरी म्हणाले की, विद्यार्थ्यांकडून सॉफ्ट स्किल्स विकसित करण्याची मागणी होत आहे. पदवी प्राप्त केल्यानंतर नोकरीच्या मुलाखतींना सामोरे जाताना तसेच व्यावसायिक क्षेत्रात काम करताना इंग्रजी संभाषण आणि इतर कौशल्ये महत्त्वाची ठरतात. विद्यार्थ्यांच्या या गरजा लक्षात घेऊन मोफत कोर्सेस उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या उपक्रमाची व्यापक प्रसिद्धी करून अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचवावी आणि विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यापीठाच्या वेबसाइटवरून तसेच इन्फोसिस स्प्रिंगबोर्डच्या वेबसाइटवरून नोंदणी करून विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने हे कोर्सेस पूर्ण करू शकतात. कोर्स पूर्ण झाल्यानंतर संबंधित प्रमाणपत्र विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणताही अतिरिक्त खर्च न करता आपली संवादकौशल्ये आणि संगणकविषयक कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव, दि. २२ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील युवती सभेच्या वतीने 'शक्तीरंग – युवती सभा गरबा सांस्कृतिक महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले. स्वयंसिद्धा उपक्रमाच्या 'स्तंभ ५ : नेतृत्व व नागरी सहभाग' या संकल्पनेअंतर्गत आयोजित या महोत्सवात विद्यापीठ परिसरातील १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे उद्घाटन व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. पवित्रा पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी सामाजिकशास्त्रे प्रशाळेचे संचालक डॉ. उमेश गोगडिया यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी गरब्याच्या माध्यमातून सांस्कृतिक एकात्मता, उत्साह आणि सामाजिक सहभागाचे दर्शन घडविले.

कार्यक्रमाचे नियोजन सायली बडगुजर आणि युवती सभा समन्वयक डॉ. शीतल पाटील यांनी केले. डॉ. विजय घोरपडे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. पौर्णिमा वाहने यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सुषमा टिंगोटे, डॉ. पौर्णिमा वाहने आणि इशिका गुप्ता यांनी सहकार्य केले.

यावेळी सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील डॉ. दिगंबर सावंत, डॉ. अभय मनसरे, प्रा. योगेश माळी, प्रा. मोईन शेख, डॉ. समाधान कुंभार, प्रा. रोशन मावळे, डॉ. गजानन देशमाने, डॉ. ज्ञानोबा सोनटक्के, डॉ. गोपाळ पाटील, प्रा. विनेश पावरा, प्रा. वीरेश पाटील, डॉ. मनोज इंगोले आणि प्रा. विशाल सपकाळे यांच्यासह प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.......................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २२ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**